कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करुनही रक्कम देऊ दिलाऊ करुन दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

३. फिर्यादी संस्थेने आरोपी कर्जाऊ रक्कमेची मागणी केली असता आरोपीने थकीत कर्जाऊ रक्कमेचे परतफेडी पोटी त्यांचे खाते असलेल्या **एचडीएफसी बँक, शाखा-पारनेर ता पारनेर जि अहमदनगर या बँकेचा चेक नंबर ०००००१ रक्कम रुपये ४३,१११/- चा तारीख २४/१२/२०२५** रोजीचा दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चीत वटेल अशी खात्री व भरवसा दिलेवरुन आरोपीचे शब्दावर विश्वास ठेऊन सदरचा चेक स्विकारला.सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या **जी एस महानगर को ऑप लि. शाखा-मार्केटयार्ड,अहमदनगर** या बँकेत तारीख २६/१२/२०२५ रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे बँकेने " सिग्नीचर डिफर्स " असा शेरा मारुन तारीख २९/१२/२०२५ रोजी न वटता परत पाठविला व तशी इंटीमेशन फिर्यादीस त्यांचे बँकेने देऊन त्यासोबत सदरचा चेक न वटता मेमोसहीत परत केलेला आहे.सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकीलामार्फत तारीख ०८/०१/२०२६ रोजी नोटीस पाठवुन चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकचे रक्कमेची मागणी केली असता सदरची नोटीस आरोपीने दिनांक १३/०१/२०२६ रोजी स्विकारली आहे. अशा प्रकारे आरोपीस नोटीस पाठवुनही आरोपीने मुदतीत फिर्यादीस चेकची रक्कम आणुन दिलेली नाही.

आशाप्रकारे चेक देतांना आरोपीने न वटणारा चेक दिला याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपुर्वक सदरचा खोटा चेक देऊन फिर्यादीची फसवणुक केलेली आहे व निगोसिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणुन फिर्यादीची आरोपी विरुध्द निगोसिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

तरी फिर्यादीची विनंती की-

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाचे रक्कमेतुन फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा ही विनंती.

